# वसई विरार शहर महानगरपालिका

## सुधारित अर्थसंकल्प सन 2020-21 सह मुळ अर्थसंकल्प सन 2021-22 अंदाजपत्रकाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 95 ला अनुसरुन

### मा. आयुक्त यांची टिपणी/ अर्थसंकल्पीय भाषण

**मा. प्रशासक महोदय,**

वसई विरार शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 95 अन्वये मी सन 2020-21 या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अंदाज व सन 2021-22 या वर्षाचे मुळ अंदाज तयार केले असून कलम 96 ते कलम 100 नुसार सदर अर्थसंकल्पीय अंदाज मा. प्रशासक यांच्या मंजुरीसाठी सविनय सादर. करत आहे.

वसई विरार शहर महानगपालिका हे एम.एम.आर.डी.ए. कार्यक्षेत्रामधील एक वेगाने विकसित होणारे नागरी क्षेत्र आहे. मागील वर्षी मार्च महीन्यामध्ये कोव्हीड 19 या जागतीक महामारीचा प्रकोप झाल्यामुळे जगाच्या पाठीवरील सर्व देशांना लॉकडाऊन करावे लागले होते. या काळात वाढत जाणारी कोव्हीड रुग्णांची संख्या तसेच त्यांच्यावर त्वरीत उपचार करणे, रुग्णसंख्या वाढु नये म्हणून मोठ्या प्रमाणवर उपाययोजना करणे या मध्ये विलगीकरण केंद्र तयार करणे, नविन कोव्हीड रुग्णालय सुरु करणे या शिवाय औषधे व वैद्यकिय उपकरणे खरेदी करणे इ. उपाययोजना करणे यावर भर देणे आवश्यक असल्याने या करीता मोठ्या प्रमाणावर निधीची गरज होती. लॉकडॉऊन मुळे उत्पन्नावर मर्यादा आल्या होत्या. शिवाय सुरळीत उत्पन्न कधी सुरु होईल हे सांगणे कठीण होते यासाठी पुढील किमान पाच ते सहा महीन्याचे आर्थिक नियोजन करुन त्यानुसार निर्णय घेण्यात आले अशा परिस्थितीतही प्रशासनाने महानगरपालिकेची आर्थिक शिस्त बिघडू दिलेली नाही असे येथे नमुद करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत लॉकडाऊन व कोव्हीड मुळे सर्वाच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे. यास्तव महानगरपालिकेच्या सुध्दा उत्पनावर परिणाम झाला आहे. या अर्थसंकल्पाची मांडणी ही सद्यस्थितीत असलेल्या उत्पन्नाच्या आधारावर तयार करण्यात आलेली आहे. आवश्यक महसुली खर्च करणे, सुरु असलेले प्रकल्प तसेच मागील वर्षी निधी अर्थसंकल्पीत झालेले प्रकल्प यांचा समावेश या अर्थसंकल्पात केला आहे. या शिवाय सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला आहे. रुग्ण संख्याही कमी आहे. परंतु अजून हा धोका टळलेला नाही म्हणून भविष्यात अशा प्रकारच्या आपदा निर्माण झाल्यास त्यास सामोरे जाण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पात आरोग्य सेवेसाठी भरीव तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच कोणताही नविन कर अथवा दरवाढ न करता सदर अर्थसंकल्प तयार केला असल्याचे येथे नमुद करण्यात येत आहे.

महानगरपालिकेने चालू वर्षी कोविड-19 साथ आटोक्यात आणण्यासाठी अंदाजे 20 कोटी खर्च केला असून सदर खर्च एम.एम.आर. रिजन मधील सर्व महानगरपालिका मध्ये सर्वात कमी आहे. कमी खर्चात साथ आटोक्यात आणण्यात प्रशासन यशस्वी ठरले याचा मला रास्त अभिमान आहे.

शहराच्या नागरीकांना किमान नागरी सुविधा पुरविणे तसेच या बरोबर शहराचा सुनियोजीत विकास होणे या करीता शहरातील सर्व घटकांचे सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. या शहराच्या सुनियोजित विकासाबाबत मी बांधील आहे. त्यासाठी तयार करण्यात आलेल्या अर्थसंकल्पामधील जमा व खर्चाच्या ठळक बाबींचा उल्लेख पुढील प्रमाणे.

# जमेच्या ठळक बाबी

(आकडे लाखात)

| अ.क्र. | जमा लेखाशिर्ष | प्रत्यक्ष रकमा 2019-20 | सुधारीत अर्थसंकल्प 2020-21 | मुळ अंदाज 2021-22 |
|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर उत्पन्न | 16361.74 | 22045.30 | 30483.62 |
| 2 | स्थानिक संस्था कर उत्पन्न | 1222.66 | 661.00 | 500.02 |
| 3 | जाहिरात कर उत्पन्न | 0.66 | 226.00 | 683.00 |
| 4 | इतर उत्पन्न | 20.69 | 37.00 | 37.00 |
| 5 | अग्निशमन सेवा उत्पन्न | 1167.74 | 1358.07 | 1640.00 |
| 6 | नगररचना उत्पन्न | 12244.46 | 6227.69 | 10916.30 |
| 7 | वाचनालय जमा रकमा | 11.48 | 13.05 | 13.05 |
| 8 | रुग्णालय सेवा उत्पन्न | 77.79 | 170.41 | 259.20 |
| 9 | तलाव उत्पन्न | 60.73 | 85.00 | 85.01 |
| 10 | स्वच्छता सेवा उत्पन्न | 1868.24 | 2526.86 | 3067.25 |
| 11 | पाणी पुरवठा सेवा उत्पन्न | 10049.37 | 17582.64 | 23524.10 |
| 12 | इतर उत्पन्न | 3460.52 | 4532.37 | 4584.56 |
| 13 | किरकोळ जमा | 45.16 | 766.33 | 986.57 |
| 14 | आपत्ती व्यवस्थापन जमा | 0.00 | 0.00 | 0.01 |
| 15 | विकास कामे जमा रकमा | 2169.93 | 2747.32 | 4056.82 |
| 16 | सर्वसाधारण अनुदाने | 37324.62 | 41090.29 | 44979.53 |
| 17 | इतर असाधारण जमा | 13923.71 | 13953.12 | 17359.92 |
| 18 | कर्ज निधी जमा | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 19 | वृक्ष प्राधिकरण उत्पन्न | 500.75 | 443.34 | 550.20 |
| 20 | प्रारंभिक शिल्लक | 59910.19 | 72609.07 | 56302.05 |
| | एकूण जमा | 160420.44 | 187074.86 | 200028.21 |

# खर्चाच्या ठळक बाबी

(आकडे लाखात)

| अ.क्र. | खर्च लेखाशिर्ष | प्रत्यक्ष रकमा 2019-20 | सुधारीत अर्थसंकल्प 2020-21 | मुळ अंदाज 2021-22 |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्मचारी वेतन भत्ते खर्च | 4957.57 | 6179.76 | 9013.94 |
| 2 | अस्थायी आस्थापना खर्च | 17.57 | 35.00 | 35.00 |
| 3 | ठेका आस्थापना खर्च | 5872.88 | 7433.65 | 8888.49 |
| 4 | सामान्य प्रशासन व इतर कार्यालयीन खर्च | 1336.27 | 2656.84 | 4360.14 |
| 5 | कर्मचाऱ्यांसाठी इतर खर्च | 2959.28 | 3866.65 | 4332.87 |
| 6 | नगर रचना खर्च | 1.00 | 41.25 | 1267.00 |
| 7 | परतावे | 66.52 | 207.10 | 104.55 |
| 8 | सदस्यांसाठी खर्च | 212.97 | 135.05 | 372.00 |
| 9 | उद्यान विकास खर्च | 784.03 | 706.64 | 2315.54 |
| 10 | दिवाबत्ती व्यवस्था खर्च | 2487.88 | 4477.96 | 6639.01 |
| 11 | मोकाट जनावरांचा बंदोबस्त | 30.55 | 58.71 | 212.64 |
| 12 | अग्निशमन व्यवस्था | 530.13 | 1152.56 | 6142.00 |
| 13 | शहर स्वच्छता खर्च | 15247.25 | 18400.25 | 20375.89 |
| 14 | रुग्णालय व्यवस्था खर्च | 1742.92 | 4079.41 | 7194.20 |
| 15 | सांस्कृतिक भवन व्यवस्था खर्च | 30.29 | 139.63 | 182.85 |
| 16 | आपत्ती नियंत्रण खर्च | 128.13 | 560.33 | 1098.01 |
| 17 | दहन दफन भुमी व्यवस्था खर्च | 481.48 | 664.30 | 1537.84 |
| 18 | क्रिडांगण व्यवस्था | 587.42 | 600.82 | 2125.00 |
| 19 | मार्केट व्यवस्था खर्च | 137.99 | 138.64 | 858.35 |
| 20 | तलाव व्यवस्थापन खर्च | 869.79 | 736.25 | 2759.15 |
| 21 | विकास कामांवरील खर्च | 21173.49 | 39389.26 | 57885.00 |
| 22 | शालेय शिक्षण व्यवस्था खर्च | 722.75 | 502.17 | 1021.57 |
| 23 | वाचनालय व्यवस्था | 34.71 | 110.53 | 230.76 |
| 24 | सामाजिक कार्यक्रम खर्च | 1342.28 | 1787.64 | 2659.27 |
| 25 | उड्डाणपुल व्यवस्थापन खर्च | 177.25 | 143.26 | 2225.00 |
| 26 | इतर खर्च | 596.90 | 1123.10 | 2840.40 |
| 27 | पाणी पुरवठा व्यवस्थापन | 9943.07 | 17389.92 | 23190.70 |
| 28 | सुरक्षा व्यवस्था | 0.50 | 1.50 | 50.00 |
| 29 | मुख्य नाले खोदाई | 928.73 | 959.00 | 500.00 |
| 30 | पर्यावरण संरक्षण | 0.00 | 0.00 | 200.00 |
| 31 | परिवहन सेवा खर्च | 921.55 | 1828.00 | 4000.00 |
| 32 | वनीकरण खर्च | 1943.44 | 1025.11 | 2299.30 |
| 33 | इतर असाधारण खर्च | 11544.80 | 14242.52 | 16848.28 |
| 34 | अखेरची शिल्लक | 72609.07 | 56302.05 | 6263.46 |
| | एकूण | 160420.44 | 187074.86 | 200028.21 |

# अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.
# (अर्थसंकल्पातील महत्वाच्या योजना व कामे)

- या वर्षाच्या अर्थसंकल्पात कोणतीही कर दर वाढ सुचविण्यात आलेले नाही.
- कोविड-19 साथीमुळे मागील अर्थसंकल्पामध्ये पुर्ण करता आलेली नाहीत अशा कामांचा समावेश या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.
- करोनाच्या पार्श्वभुमीवर वैद्यकिय आरोग्य विभागासाठी मागील वर्षापेक्षा भरीव तरतूद करण्यात आली आहे.
- “माझे कुटुंब माझी जबाबदारी” तसेच कोविड-19 चे लसीकरण या योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
- चालू वर्षामध्ये मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, मिरा भाईंदर या महानगरपालिकेच्या तुलनेत 20 कोटी इतका अत्यंत कमी खर्चामध्ये कोविड-19 च्या साथीवर प्रभावी नियंत्रण करण्यात आले.
- वसई किल्ला संवर्धन करीता रु. 1 कोटी इतकी तरतुद प्रस्तावित आहे.
- सांस्कृतिक वसई करीता रु. 1 कोटी इतकी तरतुद प्रस्तावित आहे.
- घसारा निधीची तरतुद करण्यात आली आहे.
- **UTWT रस्ते :-** ज्या ठिकाणी जुने डांबरी WBM रोड आहेत अशा ठिकाणी कॉक्रीट रस्ता एवजी UTWT रस्त्याचा पर्याय अंत्यत उपयोगी ठरतो या मध्ये रस्त्याची जाडी 6 इंच पर्यंत कमी होते तसेच अतिशय कमी वेळेत रस्त्याचे बांधकाम पुर्ण होऊन रहदारीसाठी मोकळा करता येतो. ही विशेष वैशिष्टे आहे सबब प्रायोगिक तत्वावर अशा प्रकारचे रस्त्यांसाठी 25 लक्ष पर्यंतचे काम हाती घेऊन त्याची उपयोगिता तपासून भविष्यात मनपा हद्दित अशा स्वरूपाची कामे घेणे इष्ट राहील. यासाठी तरतूद रस्ते बांधकाम या लेखार्शिषांतर्गत करण्यात आली आहे.
- **Missing Link :-** शहराचा विकास होत असताना सुनियोजित रस्त्यांचे जाळे तयार करणे आवश्यक आहे. आणि हे जाळे शहराच्या सर्वदुर उंचसखल भागामध्ये विसावलेले असते. कंटूर मॅपींग आणि प्रोग्रामींग प्रमाणे रस्त्याचे डेड एंड एकमेकांना मिळू शकत नाही. नैसर्गिक अवरोधक अदा. टेकडया, डोंगर दऱ्या, नैसर्गिक नाले, उंच सखल भुभाग, इमारती तसेच इमारतीचे भाग यामुळे अवरोधक तयार होतो. यामुळे वाहतूक ठप्प होतो व विकास खुंटतो. जर जवळच्या रस्त्याची डेड एंड ची टोके एकमेकांना जोडून सलग रस्ता तयार केला तर त्या भागाचा विकास वेगाने होतो. व दुर्लक्षित भागाचा विकास होतो. यासाठी तरतूद रस्ते बांधकाम या लेखार्शिषांतर्गत करण्यात आली आहे.
- **वाहतुक बेट विकसित करणे.:-** महानगरपालिका हद्दिमध्ये वाहतुक बेटे विकसित करून रस्त्यांच्या सौदर्यरीकरणात वाढ करणे कामी रु. 2 कोटी इतकी तरतुद प्रस्तावित आहे.
- महानगरपालिकेच्या सर्व दस्ताऐवज यांचे स्कॅनिंग करुन फायलींग करीता रु. 85 लक्ष इतकी स्वतंत्र तरतुद करण्यात आली आहे.
- महानगरपालिका आस्थापनावरील असलेल्या स्थायी कर्मचाऱ्यांना आजारपणाची वैद्यकिय प्रतिपुर्ती देयक देण्यांत येत आहे. परंतू या मध्ये काही वेळ जातो म्हणून कर्मचारी वर्गासाठी एकत्रित मेडिक्लेम काढण्यात यावा यासाठी रु. 2 कोटी तरतुद करण्यांत आली आहे.
- **दिवाबत्ती व्यवस्था :-** सद्याचे दिवे आवश्यकतेनुसार दुरुस्ती देखभालीच्या वेळी अथवा टप्याटप्याने बदलून एल ई डी व्यवस्था अंमलात आणण्याचा प्रस्ताव असून यामुळे भविष्यातील महसुली खर्चात 25 ते 30% खर्च कपात अपेक्षित आहे.
- **अग्निशमन :-** अग्निशमन विभागासाठी मुख्य अग्निशमन नियंत्रण कक्ष अत्याधुनिक व संपर्क यंत्रणा आचोळे येथे उभारण्यात येणार आहे. त्यासाठी 10 कोटींची तरतुद केलेली आहे.
- **घनकचरा व्यवस्थापन :-** डंपींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बायोमिथेनेशन आधि बायोमायनिंग करिता रु. 147.54 कोटी च्या विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत मनपा कार्यक्षेत्रातील दैनंदिन रस्ते साफसफाई करणे कामी यांत्रिक झाडू (Sweeping Machine Vehicle) लवकरच महानगरपालिकडे उपलब्ध होणार आहे.
- **नैसर्गिक आपत्ती व्यवस्था :-** अद्यावत आपतकालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्ष अत्याधुनिक बिनतारी संदेश यंत्रणा तसेच जीवरक्षक बोट, पाण्याचा निचरा करणेकामी उंच क्षमतेचे पंप घेणे बाबत नियोजन करण्यात येत आहे. यासाठी रु. 10.48 कोटी तरतुद प्रस्तावित आहे.
- **महापौर सहाय्यता निधी :-** महानगरपालिका निधीतून गरीब गरजूंना आर्थिक मदत करताना विशेष बंधनाशिवाय आर्थिक सहाय्य देता यावे हा या निधीचा प्रमुख उद्देश आहे. त्यासाठी रु. 50 लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

- **दहन व दफन भुमी :-** दहन भूमीचा इतर नागरिकांना होणारा त्रास विचारात घेऊन एकात्मीक दहन भूमी विकास कार्यक्रमांतर्गत सुशोभिकरण करुन सदर ठीकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे, पुरेशा उंच संरक्षक भिंतीची व्यवस्था करणे, सर्व धर्मीयांसाठी भुसंपादनासह दफनभूमी विकसीत करणे तसेच उपलब्ध दफन भूमींच्या विकास व सौर्द्यीकरण करणे सद्यस्थितीत 14 ठिकाणी कामे प्रस्तावित आहेत.
- **उद्याने :-** विरार पु. नारंगी येथील पिकनीक पार्कचा विकास , विरार पु. आरक्षण क्र.142 मध्ये बोटनिकल पार्कचे बांधकाम. पेल्हार धरणालगत आरक्षण क्र. 851 पिकनीक पार्कचे विकास), आरक्षण क्र 80 मध्ये एव्हरशाईन सिटी येथे विद्याविकासिनी शाळेसमोरील उद्यानासाठी आरक्षित जागेत उद्यानाचा विकास. व इतर एकूण दहा उद्यानांचा विकास प्रस्तावित आहे. पुढील वर्षात हाती घेण्यासाठी रु. 23.15 कोटी इतकी तरतुद प्रस्तावित केली आहे.
- **मार्केट व्यवस्था :-** प्र. स. जी गोखिवरे येथे बहुउद्देशिय मार्केटचे बांधकाम. , प्र. स. आय कार्यक्षेत्रात तामतलावाचे येथे मार्केटचे बांधकाम , प्र. स. डी वॉर्ड क्र. 92 नवघर पु. येथे बहुउद्देशिय इमारतीचे बांधकाम, प्र. स. ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा प. येथील प्र.क्र. 94 मधील निर्मळ येथे मार्केट शेड व इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. त्यासाठी रु. 8.58 कोटी तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
- **तलाव व्यवस्था :-** तलाव विरार प. प्र. क्र. 9 मध्ये भोंगाळे येथील तलावाचे सुशोभिकरण., प्र.स.एफ पेल्हार क्षेत्रातील वाकणपाडा तलावाचे सुशोभिकरण., प्र.स.ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा प. येथील वॉर्ड क्र. 56 नाळे तलावाचे सुशोभिकरण. प्रस्तावित आहे. त्यासाठी रु. 27.59 कोटी तरतुद करण्यात आलेली आहे.
- **क्रिडा :-** क्रिकेट खेळा व्यतिरिक्त महानगरपालिका क्रिडा विभागातर्फे सांघिक व व्ययक्तीक विशेष खेळांचे आयोजन करणे प्रस्तावित आहे. शाळांमध्ये मुलांना फुटबॉल, हॉकी, हॉलीबॉल, खो-खो यासारख्या सांघिक खेळाबरोबर बॅडमेंटन, टेबल टेनिस, जिमन्यास्टीक, व इतर व्यक्तीक खेळांचे तज्ञप्रशिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे.
- **दिव्यांग कल्याण :-** दिव्यांग कल्याणकरीता असलेला विविध योजना अंतर्गत दिव्यांगाची असलेल्या टक्केवारी नुसार प्रतीमहा अनुदान, तसेच व्यवसाय कर्जे देणे, दिव्यांग खेळाडुंना प्रोत्साहन अनुदाने, आजारी व्याधीग्रस्त दिव्यांगाना आर्थिक अर्थसहाय्य, संस्थांना अनुदान तसेच भौतिकोपचारी साधने यासाठी रु. 6.95 कोटी तरतुद प्रस्तावित आहे.
- **महिला बालकल्याण :-** महिला बालकल्याणसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने मंजूर कामाच्या विविध योजना प्रभावी पणे राबविण्यांत येत आहेत. यासाठी रु. 19.10 कोटी तरतुद प्रस्तावित आहे.
- **मागासवर्गीय योजना :-** गरीबगरजूंसाठी मोफत वैद्यकीय शिबीर, समुह गटविमा योजनेखाली मेडीक्लेम सुविधा प्राप्त करुन देणे त्याचप्रमाणे अपघाती विमा रकमे इतके थेट संरक्षणाचा लाभ देणे, दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अधिक अनुदान उपलब्ध करुन घेऊन सदर वसाहत सर्व सुखसुविधायुक्त स्वच्छ व सुंदर करणे, दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी घरकुल योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजनांतर्गत विकास कामे, विशेषत: नविन शहरी विभागात वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणे, कमी उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी आपत्कालीन केंद्रासाठी सहाय्य करणारे दुर्बल घटकांतील मच्छीमार बांधवांसाठीच्या सोयी सुविधा तसेच इतर मागासप्रवर्गातील भागातील रस्ते, गटार, दिवाबत्ती इ. समाजमंदिर, या सार्वजनिक सुविधांसह घ्यावयाच्या योजना राखीव यासाठी भरीव तरतूद रु. 29.64 कोटी करण्यात आली आहे.
- **पाणी पुरवठा :-** 1)केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत 310 कि.मी. जलवाहीनी अंथरणे व विधिध ठीकाणी 18 जलकुंभ बांधणे ही कामे प्रगती पथावर आहेत. 2) महानगरपालिका क्षेत्रात सुमारे 46 हजार नळ जोडण्या देण्यांत आल्या असून त्यांना टप्प्या टप्प्याने जलमापके बसविण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. 3) महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येस पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने खोलसापाडा 1 व 2 ही धरणे बांधण्याची योजना हाती घेण्यात आलेली आहे. यासह एकूण पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी रु. 231.90 कोटी तरतुद प्रस्तावित आहे.

**आभार,**

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. नगर विकास मंत्री, मा. पालघर जिल्हा पालकमंत्री, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मा. खासदार, मा. आमदार यांनी महानगरपालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. तसेच मा. माजी महापौर, मा. माजी उपमहापौर, मा. माजी स्थायी समिती सभापती यांच्या वेळोवेळीच्या सुचना व सन्मा. माजी गटनेते, सन्मा. माजी सर्व प्रभाग समिती सभापती, सन्मा. माजी सदस्याकडून, सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी तसेच सर्व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील करदाते, सन्मा. नागरीक यांचे त्यांनी सहकार्य केल्याबद्दल मनपुर्वक आभार व्यक्त करतो. वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभार व्यक्त करतो.

सन 2020-21 च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन 2021-22 चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक "अ", महानगरपालिकेच्या "अ" अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, दिव्यांग कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, "ब" अंदाजपत्रकाकडे परिवहन सेवेकरीता वर्ग करावयाच्या अशंदानाचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक "क", वृक्ष निधी अंदाजपत्रक, एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह विनीयोग कर्ज निधी अंदाजपत्रक, सॅटेलाईट सिटी / अमृत योजना इत्यादी विशेष निधीचे अदांजपत्रक, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 95 (अ) नुसार, सन 2020-21 या कालावधीत अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबतचा अहवाल व इतर आवश्यक सहपत्रे सोबत जोडली आहेत.

सन 2020-21 चा सुधारीत रु. 1870.74 कोटी व सन 2021-22 चा मुळ रु. 2000.28 कोटी अर्थसंकल्प अंदाज अंतीम स्विकृतीसाठी सविनय सादर.

धन्यवाद ! जय हिंद !!

दिनांक

आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका